Impact Factor
5.307 (SJIF)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173

# राजा राम मोहन राय आणि सतीप्रथा

**प्रा. डॉ. लोमेश्वर रामचंद्र घागरे**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
आर. बी. व्यास कला / वाणिज्य महाविद्यालय,
कोंढाळी, जि. नागपूर

---

राजा राम मोहन राय यांचा जन्म 22 में 1772 ला झाला. त्यांच्या वडीलांचे नांव रमाकांत होते. रमाकांत यांना सहा भाऊ होते. रमाकांत यांना तीन पत्नी होत्या. पहीली सुभद्रादेवी, दुसरी तारिणीदेवी व तीसरी रमणी देवी. त्यांच्या दुसरी पत्नी तारीणीदेवी ही राजा राम मोहन राय यांची आई होती रमाकांत राय जमीदारीचा व्यवसाय करीत होते.

राजा राम मोहन राय यांनी आपली प्रारंभीक शिक्षा वडीलाच्या देखरेखी मध्ये पूर्ण केली. पारसी भाषा त्यांना लहाणपणीच अवगत होती नंतर अरबी शिकण्यासाठी पाटणा व संस्कृत शिकण्यासाठी ते बणारस ला गेले. मुस्लीम शिक्षकांपासुन त्यांनी इस्लाम चा अभ्यास केला. त्यामुळे त्यांच्या मनात इस्लाम धर्माविषयी आदर निर्माण झाला. हिंदु धर्मातील कर्मकांडता, बहु इश्वरवाद यापेक्षा त्यांना इस्लाम धर्मातील सरलता आधिक आकृष्ट करीत होती. 15 व्या वर्षी ते तीब्बतला लामा धर्माचे अध्ययन करायला गेले. तीब्बत मध्ये राजा राम मोहन राय काही स्त्रीयांच्या संपर्कात आले. आणि त्यांच्या मनात स्त्री जाती विषयी श्रध्दा निर्माण झाली.

भारतीय समाजामध्ये अनेक वर्षापासुन अनेक वाईट प्रथा अस्तित्वात होत्या. या वाईट प्रथांमुळे समाजाचे विभाजन झाले आणि एकतेची भावना निर्माण होऊ शकली नाही. ज्या प्रथांमध्ये जाती प्रथा, स्त्रीयांची निंदणीय परीस्थीती, बालविवाह भृणहत्या आहे. या कुप्रभा बदलविण्यासाठी भारतामध्ये अनेक समाजसुधारक झाले. ज्यांनी या कुप्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला. ज्यामध्ये राजा राम मोहन राय अग्रगण्य होते. राजा राम मोहन राय यांच्या समाजिक तत्वज्ञानाचा मुलमंत्र लोकांचे कल्याण होता. समाज सुधारणेच्या क्षेत्रात राजा राम मोहन राय यांनी सर्वात महत्वाचे काम सतीप्रथा विरोधी आंदोलन करुन ब्रीटीश सरकारच्या मदतीने सतीप्रथा कायद्याने बंद करणे होते.

सती चा अर्थ आहे पतीव्रता स्त्री, ती स्त्री जी पूर्णपणे आपल्या पतीला समर्पीत आहे आणि तीचे चरीत्र निष्पाप आहे. भारतीय संस्कृती मध्ये सीता, सावीत्री, अनुसया, दमयंती इ. स्त्रीयांना सती स्त्री मानले गेले आहे. पतीच्या विषयी निष्ठा आणि समर्पन यांची अत्यंत भावणामुळे पतीच्या मृत देहाबरोबर स्वतःला जाळून घेणाऱ्या स्त्रीला सती म्हटल्या जात असे.

भारतात सतीप्रथा प्राचीन काळापासुन अस्तीत्वात होती. त्याचे ऊदाहरणे सुध्दा मिळतात जसे रामायनामध्ये मेघनाथ ची पत्नी सुलोचना, महाभारतात पंडू ची दुसरी पत्नी माद्री सती प्रथेतील क्रुरतेकडे मुस्लीम शासनाकांचे लक्ष गेले. मुगल सम्राट अकबर जहांगीर यांनी सुध्दा ही अमानवीय प्रथा बंद करण्याचा प्रयत्न केला. तसेच 1510 मध्ये अलबुर्क ने गोवा मध्ये सतीप्रथा बंद केली. परंतु त्यामध्ये या शासकांना वीशेष सफलता मिळाली

नाही. यावरुन सिध्द होते की, कधी-कधी धार्मिक अंधविश्वास मानवी बुध्दीला किती कुंठीत करुन टाकतो.

ब्रीटीश शासकांची सुरुवातीपासूनच हि निती होती की, त्यांनी हिंदु आणि मुस्लीम यांच्या धार्मीक क्रिया मध्ये हस्तक्षेप करणार नाही. म्हणुन बंगाल, मुंबई आणि मद्रास येथील इस्ट इंडीया कंपनीने सती प्रथेविषयी निष्क्रीय भुमीका घेतली. 1789 मध्ये काही इंग्रज अधिकाऱ्यांनी इस्ट इंडीया कंपनीच्या सर्वोच्च सरकारला सती प्रथेवर बंदी घालण्याची अनुमती मागीतली होती. परंतु ती मिळाली नाही. सेरामपूर च्या इसाई मीसनरी च्या रिपोर्ट नुसार 1804 मध्ये तीन महीण्यामध्ये कलकत्याच्या परिसरात जवळपास 300 सतीच्या घटणा घडल्या सतीप्रथेविषयी सर्वात वाईट कृत्य होते की, जर स्त्री आपल्या पतीसोबत सती जाण्यास विरोध केला तर तीला सती जाण्यास बाध्य केल्या जात होते, तीला तीच्या पतीच्या मृत शरीरासोबत बांधण्यात येत होते व अग्नीसंस्काराच्या वेळी ढोल वाजविल्या जात होते. जेणेकरुण तीचा आवाज दाबल्या जात असे. कुटूंबातील लोक बळजबरीपूर्वक पतीच्या देहा सोबत जाळण्याचे एक कारण हे सुध्दा होते की, ती मृत पतीच्या संपतीमध्ये कोणताही हिस्सा घेऊ नये.

सतीप्रथे विरुध्द सरकारला अनेक याचीका मिळाल्या. 05 फेब्रुवारी 1805 ला तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्ली ने सतीप्रथे बद्दल निजामत न्यायालयाला सल्ला मागीतला. निजामत न्यायालयाने हिंदु पंडितांच्या सल्याने गव्हर्नर जनरला ला रिपोर्ट पाठविली त्यानुसार अल्पवयीन मुली, गर्भवती, ज्यांची मुली-मुले लहान आहे. अशा स्त्रीयांना सती जाऊ शकत नाही. 1812 मध्ये सरकार ने सतीप्रथे विषयी काही आदेश दिले. त्यामध्ये म्हटले होते की, कोणत्याही विधवेला तीच्या इच्छेविरुध्द सती केल्या जाऊ शकत नाही 1815 आणि 1817 ला ही काही आदेश काढण्यात आले. त्यानुसार जिल्हा कलेक्टर ला आपल्या जिल्हयातील सती घेटणेचा अहवाल सरकार कडे पाठवायचा होता. परंतु या आदेशान सतीप्रथा बंद होण्यास कोणतीच मदत मिळाली नाही. 1815 ते 1817 मध्ये बंगाल मध्ये सतीच्या 864 घटणा घडल्या इस्ट इंडिया कंपनी सरकार सती प्रथा विषयी चिंतीत होती परंतु कायद्याद्वारे या प्रथेला बंदी घालण्याचे साहस त्यांच्या मध्ये नव्हते कारण सर्वसाधारण जनता आणि सेना यांच्यात असंतोष होण्याची भीती त्यांना होती. त्यांचा विचार होता की, शिक्षणाच्या प्रसाराने भारतीयच सतीप्रथे विषयी आवाज ऊठवतील आणि त्यावेळी कायद्याद्वारे ती बंद करण्यात येईल त्यांचा विचार निराधार नव्हता कारण राजा राम मोहन राय सारख्या व्यक्तींनी सतीप्रथे विषयी आवाज ऊठवला. सरकारने 1812, 1815 आणि 1817 मध्ये सतीप्रथेंविषयी जे आदेश काढले होते. त्या विरुध्द कोलकत्यातील रुढीवादी हिंदु नी सरकारला प्रार्थना केली त्याचवेळी ऑगष्ट 1816 मध्ये राजा राम मोहन राय आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सरकारला सती प्रथा बंद करण्यासाठी याचीका दिली. राजा राम मोहन राय यांनी सती प्रथेची भयंकरता समजावियासाठी बंगाली भाषेमध्ये लहान-लहान पुस्तके लीहली. त्यांनी त्याचे वृत्तपत्र संवाद कौमुदी मध्ये सती प्रथेच्या विरोधी लेख लिहिले. रुढीवादी हिंदुनी राजा राम मोहन राय यांचा तीव्र विरोध केला काही वेळा तर त्यांचे जीवण सुध्दा संकटात आले. तरीसुध्दा त्यांनी सतीप्रथेचा विरोध कायम ठेवला आणि लोकमत सुध्दा त्यांच्याकड वळू लागले..

1828 मध्ये लॉर्ड विलीयम बेटींग भारताचे गव्हर्नर जनरल म्हणुन भारतात आले. त्यांना कोर्ट ऑफ डायरेक्टर्स नी सतीप्रथा बंद करण्याचे आदेश दिले होते. बेटींग सुधारवादी होते व ते सतीप्रथा बंद करण्याआधी त्याविषयी गुप्त चौकशी करु इच्छीत होते. त्यांनी सैनीकी अधिकारी, पोलीस अधिकारी, निजामत न्यायालय, भारतीय समाजसुधारक यांच्याजवळ चौकशी केली राजा राम मोहन राय यांनी सती प्रथा बंद करण्याचे आवाहन

केले. त्यामुळे लॉर्ड बेटींग ने सतीप्रथा बंद करण्याचे मन बनविले होते. त्यांनी 8 नोव्हेंबर 1829 ला आपल्या समीतीसमोर सती प्रथा बंदी चा प्रस्ताव ठेवला व आपले मत मांडले. कौंन्सील मध्ये बेटींग चा प्रस्ताव सर्वसंमतीने पास झाला. 4 डिसेंबर 1829 ला सरकारने बंगाल प्रेसीडेंसी मध्ये सतीप्रथा गैर कानुनी घोषीत केली. कायद्या मध्ये म्हटल्या गेले की जो कोणी स्त्री ला बळजबरीने सती जाण्यास बाध्य करेल त्यांना प्राणदंड दिल्या जाऊ शकतो.

सतीप्रथा विरोधी कायद्या पास झाल्यावर लोकांमध्ये कोणताही असंतोष निर्माण झाला नाही. परंतु रुढीवादी हिंदुनी पराजय स्वीकारला नाही. 19 डीसेंबर 1829 ला त्यांनी हा कायद्या रद्द करण्यासाठी लॉर्ड बेटींगला निवेदन दिले. लॉर्ड बेटींग ने 14 जानेवारी 1830 ला सतीप्रथा समर्थका सोबत भेट घेतली व त्यांना सांगीतले की, ते सम्राटांच्या कौन्सील मध्ये अपील करु शकतात. 16 जानेवारी 1830 ला राजा राम मोहन राय आणि त्यांच्या समर्थकांनी लॉर्ड बेटींग ला सतीप्रथा विरोधी कायद्यासाठी धन्यवाद दिले.

रुढीवादी पक्षाने सम्राटांच्या कौन्सील मध्ये सतीप्रथा विरोधी कायद्या रद्द करण्यासाठी निवेदन पाठवीले. राजा राम मोहन राय सुध्दा सतीप्रथा कायद्याच्या समर्थनार्थ अपील करण्यासाठी इंग्लंडला गेले त्यांनी आपले दिवेन कॉमन्स मध्ये सादर केले. रुढीवादी पक्षाने प्रीवी कौन्सील मध्ये निवेदन दिले तेंव्हा राजा राम मोहन राय सुध्दा तेथे हजर होते. प्रीवी कौन्सील ने रुढीवादी पक्षाचे निवेदन अस्वीकार केले. अशा प्रकारे राजा राम मोहन राय यांच्या प्रयत्नाने भारतात सती प्रथा कायद्याद्वारे बंदी झाली. या नंतरसुध्दा काही सतीच्या घटणा घडल्या परंतु सामान्यतः शिक्षणाच्या प्रसार प्रचाराणे ही जगन्य व घृणीत प्रथा पूर्णपणे बंद झाली.

**संदर्भ ग्रंथ :**


- आर.सी. मुजुमदार, द हिस्ट्री एंड कल्चर ऑफ इंडीयन पीपूल, खंड 2 (1960)
- के.के. दत्ता, एज्युकेशन एंड सोशल एमीलीओरेशन ऑफ वूमेन इन प्री-म्युटीनी इंडीया.
- जे.एन. सरकार, द हिस्ट्री ऑफ बेंगाल : मुस्लीम पीरीयड
- एन. के. सीन्हा, द हिस्ट्री ऑफ बेंगाल : 1757-1905
- मोहीनी गूप्ता, राजा राम मोहन रॉय व्यक्ती और विचार


Research Hub International Journal